18-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/17/2025 10:17 PM Page 1



## निवडक

### राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धांसाठी वुशू निवड चाचणी २१ रोजी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १७ :** असोसिएशन ऑफ गोवा वुशू यांनी आगामी राष्ट्रीय वुशू अजिंक्यपद स्पर्धांसाठी निवड चाचण्यांचे आयोजन केले आहे. दि. २१ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता शिवोली येथील हेल्थ अँड रिक्रिएशन येथे सदर चाचण्या होणार आहेत. या चाचण्यांद्वारे तीन प्रमुख राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये गोव्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी खेळाडूंची निवड केली जाणार आहे. यात २६ ते ३१ मे २०२५ दरम्यान तामिळनाडूतील नमक्कल येथे होणारी २५ वी सब–ज्युनियर राष्ट्रीय वुशू चॅम्पियनशिप; १४ ते १९ जून २०२५ दरम्यान राजस्थानातील जयपूर येथे होणारी ३४वी सिनियर राष्ट्रीय वुशू चॅम्पियनशिप; आणि १ ते ६ जुलै २०२५ दरम्यान हैदराबाद, तेलंगणा येथे होणारी २४ वी ज्युनियर राष्ट्रीय वुशू चॅम्पियनशिप स्पर्धेचा यात समावेश आहे. या चाचण्या ८ ते ४० वयोगटातील मुले आणि मुली, पुरुष आणि महिलांसाठी खुल्या आहेत. निवड सांडा येथे २० किलो ते १००+ किलो पर्यंत आणि ताओलू श्रेणींमध्ये होतील. ज्यात बेअरहँड, शॉर्ट वेपन आणि लाँग वेपन रूटीनचा समावेश आहे. कुंफू खेळाडूदेखील संबंधित चाचण्यांमध्ये सहभागी होऊ शकतात. गोव्यातील सर्व पात्र वुशू खेळाडूंना सहभागी होण्यासाठी आणि राष्ट्रीय पातळीवर राज्याचे प्रतिनिधित्व करण्याच्या या संधीचा पुरेपूर फायदा घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ९८२२१५१०२८/ ९८२३२०७४७० या क्रमांकांवर संपर्क साधावा.

---

### हरमल येथे ३मेपासून क्रिकेट स्पर्धा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १७ :** फ्रेंड्स इलेव्हन आयोजित पेडणे तालुका मर्यादित वॉर्ड वायझ क्रिकेट स्पर्धा, दि. ३ व ४ मे रोजी सकाळी ९ पासून, भटवाडी मैदानावर खेळविण्यात येईल. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख व वैत्तकिक बक्षिसे देण्यात येईल. अधिक माहिती साठी संदीप वायंगणकर ९८३४७०५५३१ यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन फ्रेंड्स संघाने केले आहे.

---

### फोंड्यात रविवारी 'चैत्रपालवी'

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. १७ :** चतुरंग गोवा या संस्थेतर्फे नवोदित कलाकारांसोबत प्रथितयश कलाकारांचा कलाविष्कार घडवणारा चैत्रपालवी हा अभिजात हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम फोंडा येथील क्रांती मैदानावर येत्या रविवार, दि. २० एप्रिल रोजी संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत होणार आहे. यासाठी तज्ज्ञ समितीने उदयोन्मुख गायक विक्रांत रामा नाईक, संवादिनी वादक आकाश श्रीकांत जल्मी व गोमंतकीय ज्येष्ठ गायिका डॉ. शिल्पा डुबळे परब यांची निवड केली आहे. विक्रांत नाईक हे सुप्रसिद्ध गायक शशांक मक्तेदार यांचे शिष्य असून विविध संगीत संमेलनात त्यानी आपली कला पेश केली आहे. दुसरे उदयोन्मुख कलाकार आकाश जल्मी हे राया कोरगांवकर यांचे शिष्य असून गेल्या तीन वर्षांपासून यशवंत वैष्णव या तबलापटूकडून लहरा शिक्षण घेत आहेत. डॉ. शिल्पा डुबळे परब यांनी महेशकुमार चिंचखंडी व डॉ. प्रभा अत्रे यांची तालीम घेतली असून विविध संगीत संमेलनामधून आपली कला पेश केली आहे. कित्येक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी त्या सन्मानित आहेत.

---

### साळ येथे रविवारी आध्यात्मिक सत्संग

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. १७ :** येथील श्री भूमिका मंदिरात रविवार, दि. २० एप्रिल रोजी संध्याकाळी ७ ते ९.३० वाजेपर्यंत आध्यात्मिक सत्संगचे आयोजन करण्यात आले आहे. एक तुही निरंकार सद्‌गुरु माता सुदिक्षा महाराजा यांच्या कृपेने बाल संत हर्षल पेडणेकर यांच्या वाढदिवसानिमित्त प. आ. महात्मा तेजस घोरपडे ( प्रचारक सातारा ) यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर सत्संग होणार आहे.

---

### कोरगावात आज 'इथे ओशाळला मृत्यू'

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १७ :** पेठेचावाडा येथील जागृत श्री देव रघुगोनशेठ देवस्थानच्या वार्षिक सत्यनारायण महापुजेनिमित हरमल दुर्वांकुर कला केंद्र निर्मित 'इथे ओशाळला मृत्यू' नाटक शुक्रवार, दि. १८ रोजी रात्री ९ वाजता श्री देव रघुगोनशेठ प्रांगणात होणार आहे. या नाटकात शशिकांत कोरकणकर,प्रकाश नाईक रामजी,संजय नाईक,दत्ताराम ठाकूर,अर्जुन गडेकर,विजय बर्डे,भरत वस्त,भावेश गडेकर,रामचंद्र केरकर,प्रकाश कोरकणकर,महादेव गावडे,सोनिया शेट्ये तसेच संजय र. नाईक,श्रीकांत कान्होजी, सागर कोरकणकर यांच्या भूमिका आहे.

# पंजाब किंग्सचे असणार आरसीबीसमोर आव्हान

## आज आमनेसामने | चहल, मॅक्सवेलकडून संघाला मोठ्या अपेक्षा







**बंगळुरू, दि. १७ :** इंडियन प्रिमिअर लीगमध्ये उद्या शुक्रवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि रॉयल्स चॅलेंजर्स बेंगलोर यांच्यात येथील चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार आहे. आरसीबीसाठी घरच्या मैदानावर जिंकणे हे एक आव्हान आहे जर आरसीबीला हा सामना जिंकायचा असेल तर त्यांना पंजाबच्या फिरकी हल्ल्यापासून सावध राहावे लागेल.

गुजरात टायटन्सच्या आर. साई किशोर आणि दिल्ली कॅपिटल्सच्या कुलदीप यादव आणि विपराज निगम यांच्याविरुद्ध आरसीबीच्या फलंदाजांना बेंगळुरूच्या संथ खेळपट्टीवर संघर्ष करावा लागला. आता युजवेंद्र चहल आणि ग्लेन मॅक्सवेल त्याच्या या कमकुवतपणाचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. एवढेच नाही तर चहल आणि मॅक्सवेल बऱ्याच काळापासून आरसीबीकडून खेळत आहेत आणि त्यांना येथील परिस्थितीची चांगली जाणीव आहे.

कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध चार विकेट घेऊन फॉर्ममध्ये परतलेल्या चहलचा सामना करणे कोणत्याही फलंदाजासाठी तसे सोपे नाही, तर मॅक्सवेलला त्याच्या खराब फलंदाजी कामगिरीनंतरही संघात स्थान मिळणे निश्चित आहे. चहल जादुई चेंडूंपेक्षा लांबीचा मास्टर आहे. हा लेगस्पिनर ऑफ–स्टंपच्या बाहेर गोलंदाजी करतो, ज्यामुळे फलंदाजांना लांब शॉट्स खेळण्यास भाग पाडले जाते, ज्यामुळे ते सीमारेषेजवळ झेलबाद होतात. तो त्याच्या वेगातही हुशारीने बदल करतो आणि जर फलंदाजांना त्याच्याविरुद्ध षटकार मारायचे असतील तर त्यांना अतिरिक्त प्रयत्न करावे लागतात. मॅक्सवेल हा एक फिरकी गोलंदाज आहे

दुसरीकडे, आरसीबीकडे कृणाल पांड्या आणि सुयश शर्मा यांच्या रूपात चांगले फिरकी गोलंदाज आहेत आणि संघाला त्यांच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असेल. पंजाब संघाकडे अर्शदीप सिंग आणि मार्को जॉक्सेन यांच्या रूपात चांगले वेगवान गोलंदाज आहेत, जरी ते आरसीबीच्या जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमार यांच्याइतके अनुभवी नाहीत.

रजत पाटीदार आणि श्रेयस अय्यर यांच्यात फारसे साम्य नाही. या स्पर्धेत फलंदाज म्हणून उत्कृष्ट रेकॉर्ड असलेल्या अय्यरने आयपीएल विजेत्या कर्णधार म्हणून आपली ओळख सिद्ध केली आहे. दुसरीकडे, पाटीदार आयपीएलमध्ये पहिल्यांदाच कर्णधार बनला आहे. पण ही तफावत इथेच संपते कारण हे दोन्ही खेळाडू शांत राहून त्यांच्या संघांचे नेतृत्व उत्तम कामगिरीने करत आहेत. हे दोन्ही खेळाडू फिरकी गोलंदाजीविरुद्ध चांगले फलंदाज मानले जातात आणि त्यामुळे फलंदाजीत त्यांची भूमिका महत्त्वाची असेल. कोलकाताविरुद्धच्या कमी धावसंख्येच्या सामन्यात विजय मिळवल्याने पंजाबला उत्साह मिळाला असता, परंतु त्यांना आरसीबीपासून सावध राहावे लागेल, कारण त्यांच्या फलंदाजी आणि गोलंदाजीत खूप खोली आहे आणि त्यांच्यावर मात करणे कोणत्याही संघासाठी सोपे काम नाही.

**संभाव्य प्रतिस्पर्धी संघ**

आरसीबी : फिल सॉल्ट, विराट कोहली, रजत पाटीदार (कर्णधार), लियाम लिव्हिंगस्टोन, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), टीम डेव्हिड, कृणाल पंड्या, भुवनेश्वर कुमार, जोश हेजलवुड, सुयश शर्मा, यश दयाल.

पंजाब किंग्स : प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंग (यष्टीरक्षक), श्रेयस अय्यर (कर्णधार), नेहल वढेरा, शशांक सिंग, मार्कस स्टॉइनिस, ग्लेन मॅक्सवेल, मार्को जॅनसेन, झेवियर बार्टलेट, अर्शदीप सिंग, युझवेंद्र चहल.

# मुंबई टी–२० लीगमध्ये सूर्या, अय्यरला खेळावेच लागणार





**मुंबई, दि. १७ :** सध्या आयपीएल २०२५ चा १८ वा हंगाम सुरु आहे, यामध्ये सध्या भारतीय खेळाडू सध्या व्यस्त आहेत. भारताच्या संघाने २०२४ मध्ये झालेल्या टी –२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारताचा कर्णधार रोहित शर्माने टी– २० क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्यानंतर संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवला करण्यात आले आहे. भारताचा संघ २०२६ मध्ये होणाऱ्या विश्वचषकामध्ये सहभागी होणार आहे. त्यामुळे मुंबई क्रिकेट असोसिएशनने खेळाडूंसाठी नवीन आदेश जारी केले आहेत. त्यामध्ये आतापासून मुंबईसाठी देशांतर्गत क्रिकेट खेळणाऱ्या सर्व खेळाडूंना मुंबई टी–२० लीगमध्ये सहभागी होणे बंधनकारक असेल, असे नमूद केले आहे. अजिंक्य रहाणे, सूर्य कुमार, श्रेयस अय्यर, शिवम दुबे, पृथ्वी शॉ यांसारख्या खेळाडूंना असा संदेश देण्यात आला आहे की जर त्यांची इंग्लंड दौऱ्यासाठी निवड झाली नाही तर त्यांना या लीगमध्ये सहभागी व्हावे लागेल. रोहितला या लीगचा मुख्य चेहरा बनवले जाईल.

भारतीय राष्ट्रीय संघाचा भाग असलेल्या सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, शार्दुल ठाकूर, शिवम दुबे यांच्यासह सर्व खेळाडूंनाही या लीगमध्ये खेळण्याचे आदेश देण्यात आले आहेत. एमसीएने याबाबत एक

**मुंबई क्रिकेट असोसिएशनचा आदेश**

निवेदन जारी केले आणि म्हटले की, मुंबईतील सर्व भारतीय खेळाडूंना कळविण्यात आले आहे की त्यांना टी–२० मुंबई लीगमध्ये खेळावे लागेल. ही लीग आयपीएलनंतर लगेच सुरू होणार आहे, हे अनिवार्य आहे. भारतीय संघाकडून खेळणाऱ्या किंवा दुखापतग्रस्त खेळाडूंनाच सूट दिली जाईल.

एमसीएने म्हटले आहे की या लीगमध्ये खेळणाऱ्या प्रत्येक भारतीय खेळाडूला १५ लाख रुपये दिले जातील, जे लिलावात मिळालेल्या पैशांपासून वेगळे असतील. एमसीएने म्हटले आहे की, भारतीय खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी असोसिएशनकडून स्वतंत्रपणे १५ लाख रुपये दिले जातील. याशिवाय, त्यांना लिलावातून वेगळे उत्पन्न मिळेल. आम्ही मूळ किंमत आणि इतर तपशीलांवर काम करत आहोत. आगामी लीगमध्ये सहभागी होण्यासाठी सुमारे २८०० स्थानिक खेळाडूंनी नोंदणी केली आहे. टी–२० मुंबई लीगचा लिलाव मे महिन्यात होणार आहे. असोसिएशन २६ मे पासून स्पर्धा सुरू करण्याचा विचार करत आहे, ज्याचा विजेतेपद सामना ५ जून रोजी खेळवला जाऊ शकतो.

# सुपर ओव्हरमध्ये दिल्लीचा 'सुपर' विजय




**नवी दिल्ली, दि. १७ :** यंदाच्या आयपीएलमधील पहिल्यावहिल्या सुपर ओव्हरमध्ये दिल्लीने घरच्या मैदानावर राजस्थानवर शानदार विजय मिळवला. राहुल आणि ट्रिस्टन स्टब्ज यांनी दिल्लीला शानदार विजय मिळवून दिला.

१२ धावांचा पाठलाग करताना राहुलने पहिल्या चेंडूवर दोन धावा काढल्या. थ्रो अचूक असता तर राहुल रनआऊट झाला असता. दुसऱ्या चेंडूवर राहुलने चौकार खेचला. तिसऱ्या चेंडूवर राहुलने एक धाव मिळवली. चौथ्या चेंडूवर ट्रिस्टन स्टब्जने षटकार खेचत दिल्लीच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

तत्पूर्वी, मिचेल स्टार्कने टाकलेल्या षटकात शिमोरन हेटमायरला धाव काढता आली नाही. दुसऱ्या चेंडूवर त्याने चौकार लगावला. तिसऱ्या चेंडूवर त्याने एक धाव काढली. चौथ्या चेंडूवर ध्रुव जुरेलने चौकार लगावला. पंचांनी नोबॉलचा कौल दिला. अशा रीतीने एका चेंडूवर पाच धावा निघाल्या. पुढच्या चेंडूवर रियान पराग रनआऊट झाला. पाचव्या चेंडूवर चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात यशस्वी जैस्वाल रनआऊट झाला आणि राजस्थानचा डाव आटोपला. राजस्थानने ११ धावा केल्या.

१८९ धावांच्या आव्हानात्मक लक्ष्याचा पाठलाग करताना संजू सॅमसन आणि यशस्वी जैस्वाल यांनी ३४ चेंडूत ६१ धावांची खणखणीत सलामी दिली. विपराज निगमच्या षटकात चौकार, षटकार खेचल्यानंतर संजूला दुखापतीचा त्रास जाणवला. एक चेंडू खेळून संजू रिटायर हर्ट झाला. रियान परागला अक्षर पटेलने त्रिफळाचीत केलं. ३७ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह ५१ धावांची खेळी करून यशस्वी जैस्वाल बाद झाला. यशस्वी बाद झाल्यानंतर नितीश राणाने सामन्याची सूत्रं हाती घेतली. . नितीशला बाद करत स्टार्कने राजस्थानला धक्का दिला. मोहित शर्माने टाकलेल्या १९व्या षटकात राजस्थानने १४ धावा काढल्या. शेवटच्या षटकात राजस्थानला ९ धावांची आवश्यकता होती. मात्र मिचेल स्टार्कच्या घोटीव गोलंदाजीसमोर शिमोरन हेटमायर आणि ध्रुव जुरेल जोडीला चौकार किंवा षटकार मारता आला नाही. शेवटच्या चेंडूवर राजस्थानला दोन धावांची आवश्यकता होती. मात्र दुसरी धाव घेण्याच्या प्रयत्नात ध्रुव जुरेल रनआऊट झाला आणि सामना सुपर ओव्हरमध्ये जाणार हे स्पष्ट झालं. राजस्थानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. जेक फ्रेझर मॅकगर्क या लढतीतही आततायी फटका खेळून बाद झाला. त्याच्या जागी करुण नायर फलंदाजीला आला. चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात करुण भोपळाही न फोडता बाद झाला. यानंतर अभिषेक पोरेल आणि के. एल.राहुल यांनी डाव सावरला. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ६३ धावांची भागीदारी केली. जोफ्रा आर्चरने राहुलला बाद करत ही जोडी फोडली. त्याने ३२ चेंडूत ३८ धावांची खेळी केली. थोड्याच वेळात अभिषेक पोरेलही तंबूत परतला. वानिंदू हासारंगाने त्याला बाद केलं. त्याचं अर्धशतक एका धावेने हुकलं. कर्णधार अक्षर पटेल याने ट्रिस्टन स्टब्जला साथीला घेत पाचव्या विकेटसाठी १९ चेंडूत ४१ धावांची भागीदारी केली. अक्षर करुन बाद झाला. यानंतर स्टब्जला आशुतोष शर्माची साथ मिळाली. या जोडीने सहाव्या विकेटसाठी १९ चेंडूत ४२ धावांची भागीदारी केली. या दोन भागीदाऱ्यांच्या बळावर दिल्लीने राजस्थानसमोर १८९ धावांचं लक्ष्य ठेवलं.



# चिकाटीने अभ्यास केल्यास यश नक्की

**दिनार म्हार्दोळकर : अंबिये महाविद्यालयात ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती प्रदान सोहळा**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**विर्नोडा, दि. १७ :** विद्यार्थ्यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवासात चिकाटीने अभ्यास केल्यास यश निश्चितपणे प्राप्त होते, असे प्रतिपादन दिनार म्हार्दोळकर यांनी केले. ते संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयात आयोजित केलेल्या ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा आणि संयोजक प्रा. आनंद कोळंबकर उपस्थित होते. संत सोहिरोबानाथ अंबिये शासकीय कला आणि वाणिज्य महाविद्यालय, विर्नोडा महाविद्यालययातील परिसंवाद सभागृहात ब्लू क्रॉस लॅबोरेटरीज शिष्यवृत्ती वितरण समारंभ यशस्वीरित्या पार पडला. या सोहळ्यात शैक्षणिक उत्कृष्टता आणि समर्पणाची दखल घेत विविध वर्गातील १८ पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पुरस्कार प्रदान करण्यात आले. शिष्यवृत्ती समितीचे संयोजक प्रा. आनंद कोळंबकर यांनी शिष्यवृत्ती वितरण समारंभाचे संयोजन केले. महाविद्यालय सर्व शिष्यवृत्ती प्राप्तकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करते आणि त्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रयत्नांमध्ये सतत यश मिळावे अशी प्रार्थना करतो, असे उद्गार आपल्या मनोगतात प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा यांनी काढले. यावेळी प्राचार्य डॉ जुवांव कोस्टा यांनी शिष्यवृत्ती प्राप्तकर्त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी वचनबद्ध राहण्यासाठी प्रोत्साहित केले.

# पावसाळ्यापूर्वी तातडीने उपाययोजना करा

## पूर प्रतिबंधक उपायांसाठी आमदारांकडून पिळगाव व शिरगाव येथे पाहणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १७ :** मये मतदारसंघातील बागवाडा–पिळगाव तसेच शिरगाव येथे पावसात पाणी साचून पूर परिस्थिती निर्माण होऊन धोका असल्याने त्यावर उपाययोजना करण्यासाठी कॅप्टन पोर्ट्‌सचे अधिकारी तसेच पंचायत मंडळ यांच्या समवेत आमदार प्रवीण शेट यांनी परिसराची पाहणी करून या ठिकाणी पावसापूर्वी उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत.

बागवाडा पिळगाव येथे दरवर्षी पावसात पाणी भरून मोठा पूर येतो. या ठिकाणी मांडवीचा फाटा आहे, तो गेले अनेक वर्षे गाळ न काढल्याने पाणी येथे तुंबून राहते. त्यावर उपाय करण्यासाठी आज आमदार शेट यांनी पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत कॅप्टन ऑफ पोर्ट्‌चे अधिकारी, पिळगाव सरपंच शर्मिला वालावलकर, उपसरपं उमाकांत प्रभुगावकर, सुनील वायंगणकर, मोहिनी जल्मी, ग्रामस्थ आदी होते.

या ठिकाणी जो फाटा आहे, तो सुमारे १०० मीटर खोल करून हे काम पूर्ण होताच पाण्याचा निचरा व्यवस्था होईल व पुराचा धोका टळेल, असे आमदार शेट यांनी सांगितले



**पिळगाव : पूरप्रतिबंधक उपाययोजनेबाबत पाहणी करताना आमदार प्रेमेंद्र शेट सोबत अधिकारी व पंच.**

मतदारसंघात पावसापूर्वीची कामे पूर्ण करण्यासाठी जलसंपदा खाते, कॅप्टन ऑफ पोर्ट्‌स तसेच पंचायतींना आपण आदेश दिलेले असून गटारे उपसणे, साचलेली माती गटातून काढणे तसेच विविध ठिकाणी पाण्याचा निचरा योग्य व्हावा, याची दखल घेण्याचे आदेश आपण दिलेले आहे, असे आमदार शेट यांनी सांगितले.

शिरगाव येथे सरपंच वेदिका शिरगांवकर, सूर्यकांत पाळणी, देवराज गावकर, जयंत गावकर या वेळी उपस्थित होते.


मये मतदारसंघातील विविध पंचायत विभागात पावसापूर्वी जी कामे करणे गरजेची आहेत ती तातडीने पूर्ण करण्याचे आदेश आपण दिल्याचे आमदार शेट यांनी सांगितले.

पिळगाव येथील पुराची समस्या लोकांना त्रासदायक ठरत आहे, यावर आता कायमस्वरूपी उपाय करण्याच्या दृष्टीने आम्ही कॅप्टन पोर्ट्‌च्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून या ठिकाणची समस्या दूर करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आमदार शेट यांनी सांगितले.

# प्रशिक्षकासह तिघांना बाहेरचा रस्ता







**मुंबई, दि. १७ :** या वर्षीच्या (२०२५) बॉर्डर–गावस्कर ट्रॉफीमध्ये १–३ ने लज्जास्पद पराभव आणि मालिकेदरम्यान ड्रेसिंग रूममधील गोपनीय संवाद लीक झाल्यानंतर बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. संघातील शांतता भंग केल्याच्या तक्रारीनंतर बोर्डाने तात्काळ कारवाई करत तीन प्रशिक्षकांना पदावरून हटवले आहे.

सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर, ज्यांचा कार्यकाळ फक्त ८ महिन्यांचा होता, यांना हटवण्यात आले आहे. त्याचबरोबर, क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी. दिलीप आणि प्रशिक्षक सोहम देसाई यांनाही घरचा रस्ता दाखवण्यात आला आहे.

ड्रेसिंग रूममधून बाहेर पडणाऱ्या बातम्यांमुळे संघातील वातावरण बिघडत असल्याची तक्रार एका वरिष्ठ सदस्याने केली होती. याच पार्श्वभूमीवर बीसीसीआयने अलीकडेच घेतलेल्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**शांतता भंग केल्याप्रकरणी बीसीसीआयची मोठी कारवाई**

नायरच्या जागी सध्या तरी कोणत्याही नव्या प्रशिक्षकाची नेमणूक केली जाणार नाही, कारण सीतांशु कोटक आधीच फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहेत. दिलीपची जबाबदारी रायन टेन डोशेटकडे सोपवण्यात आली आहे.

ट्रेनर सोहम देसाई यांची जागा आता एड्रियन ली रु घेतील. आयपीएलमध्ये पंजाब किंग्जसोबत काम करणाऱ्या एड्रियन यांचा बीसीसीआयसोबत आधीच करार झालेला आहे. त्यांनी याआधी २००२–०३ मध्ये भारतीय संघासोबत, तसेच २००८–१९ दरम्यान कोलकाता नाईट रायडर्ससोबतही काम केले आहे. दरम्यान आता टीम इंडियाच्या संघ व्यवस्थापनात झालेले हे बदल आगामी स्पर्धांसाठी निर्णायक ठरू शकतात.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २२५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 225 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .